महावितरण

(महाराष्ट्र सरकारचा उपक्रम)

CIN : U४०१०९MH२००५SGC१५[illegible]

सामुग्री व्यवस्थापन कक्ष, प्रकाशगड, १ ला मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

फोन - २६४७४२११ / २६४७२१३१, फॅक्स - ०२२ - २६४७३४२९, ग्राम - मुंबई ग्रीड - मुंबई, ई - मेल - cestores@mahadiscom.in

जा. क्र. मु.अ./साव्यक/साविनि/ 001324 दिनांक. 28 APR 2016

प्रति,
सर्व अधीक्षक अभियंता,
म. रा. वि. वितरण कंपनी मर्या.,
मंडल कार्यालय,

**विषय :** तालुक्याच्या ठिकाणी उभारण्यात येणा-या ट्रान्सफॉर्मर भवनसाठी लागणारा निधी उपलब्ध करुन घेणेबाबत.

**संदर्भ :** १. आरईएन/जन/२०१५-१६/ट्रान्सफॉर्मर/१३८१ दि.२९ मार्च २०१६ आणि
२. आरईएन/जन/२०१५-१६/ट्रान्सफॉर्मर/१४०३ दि.३० मार्च २०१६

संदर्भिय विषयानुसार कळविण्यात येते की, महावितरण आपल्या सर्व प्रकारच्या ग्राहकांना अखंडीत व नियमीत वीज पुरवठा मिळावा यासाठी प्रयत्नशील आहेच. वितरण रोहित्र वेगवेगळया कारणास्तव नादुरुस्त झाल्यास त्याची लवकर दुरुस्ती व्हावी या उद्देशाने तालुक्याच्या ठिकाणी ट्रान्सफॉर्मर भवन उभारण्याचे महावितरणने नियोजन केले असुन त्यामुळे रोहित्र दुरुस्तीसाठी लागणारा वाहतूक खर्च व कालावधीमध्ये मोठया प्रमाणात बचत होणार आहे.

प्रति ट्रान्सफॉर्मर भवन उभारणीसाठी अंदाजीत खर्च रु. ५२.३५ लाख एवढा येणार आहे. मा.ऊर्जामंत्र्यांनी सर्व पालकमंत्री तथा स्थानिक लोकप्रतिनिधींना जिल्हा विकास नियोजन समीतीच्या नाविन्यपूर्ण योजनेमधुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत मार्गदर्शक सूचना अग्रेषित केल्या आहेत. शिवाय संदर्भित पत्र क्र.२ नुसार महा संचालक, महा ऊर्जा यांनीसुध्दा सर्व मा. जिल्हाधिकारी यांना डिपीसीच्या नाविन्यपूर्ण योजनेतून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले आहे.

तरी हया द्वारे आपणांस कळविण्यात येते की, आपल्या जिल्हयातील एकुण नियोजीत ट्रान्सफॉर्मर भवनासाठी लागणा-या खर्चाची मागणी जिल्हा नियोजन विकास समीतीच्या "नाविन्यपुर्ण योजने" अंतर्गत आपल्या स्तरावर करण्यात यावी यासाठी मा. जिल्हाधिकारी तसेच मा. पालकमंत्री यांच्याशी नियमित पाठपुरावा करून सन २०१६-२०१७ साठी नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत "ट्रान्सफॉर्मर भवन "च्या निधी उपलब्धतेसाठी जास्तीत जास्त प्रयत्न करावा.

मुख्य अभियंता (साव्य)

**सोबत** - संदर्भ पत्र क्र.१ व २ ची प्रत

**प्रत सविनय सादर -**
१) संचालक (संचलन)/ (प्रकल्प)/ (वित्त), महावितरण, मुंबई.
२) कार्यकारी संचालक (वितरण-२), महावितरण, मुंबई.

**प्रत सस्नेह रवाना -**
सर्व मुख्य अभियंता,म. रा. वि. वितरण कंपनी मर्या.,परिमंडळ कार्यालय

Marathi letter to All SE DPC-Tf Bhavan

R-20861/2016

**NITIN GADRE I.A.S.**
**DIRECTOR GENERAL**

सत्यमेव जयते

Chief Engineer (MM Cell)
MSEDCL, MUMBAI-51
Inward/Outward No.: 853
Date: 20/04/2016

MEDA महाऊर्जा

आरईएन/जन/२०१५-१६/ट्रान्सफॉर्मर/ १४०३ दि. ३० मार्च २०१६

विषय: तालुक्याच्या ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या टान्सफॉर्मर भवनासाठी लागणारा निधी उपलब्ध करुन देणेबाबत.

संदर्भ : महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) या कार्यालयाचे दिनांक २९ मार्च २०१६ रोजीचे पत्र

श्री संजीव कुमार,

या संदर्भात दिनांक २८ मार्च २०१६ रोजी मा.मंत्री (ऊर्जा) तथा मा.अध्यक्ष, महाऊर्जा यांच्या दालनात महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत बैठक झाली. सदर बैठकीत शासनाने मोठया प्रमाणात अपारंपरिक ऊर्जा निर्मितीचे उद्दिष्ट निश्चित केले असून भविष्यात महावितरणचे जाळे सक्षम करणे गरजेचे असल्याची चर्चा झाली. यामध्ये ट्रान्सफॉर्मर महत्वाची भूमिका बजावतो. यास्तव प्रत्येक तालुक्यामध्ये ट्रान्सफॉर्मर भवन उभारण्याचा महावितरणने यापूर्वीच निर्णय घेतला असून त्यासंदर्भात डीपीसीच्या नाविन्यपूर्ण योजनेतून निधी उपलब्ध करणे शक्य होईल अशी देखील चर्चा झाली.

यासंदर्भात वरिष्ठ स्तरावरुन सर्व संबंधितांना तातडीने पत्र देण्यात येईल असे निश्चित झाले. त्यादृष्टीने मी दिनांक २९ मार्च २०१६ रोजी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पत्र दिले असून त्याची प्रत आपणास देण्यात आली आहे. सदरची प्रत पुनश्च: आपले माहितीस्तव सोबत जोडून पाठवित आहोत. तथापि असा निधी उपलब्ध होण्यासाठी महावितरणच्या जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांना मंजूर धोरणानुसार प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे देणे आवश्यक आहे. तरी यासंदर्भात आपले स्तरावरुन पुढील आवश्यक कार्यवाहीबाबत योग्य त्या सूचना संबंधितांना द्याव्यात ही विनंती.

सस्नेह,

CE MM Pl. reply

Pl. Put up
18/4

आपला

(नितिन गद्रे)

श्री. संजीव कुमार, भा.प्र.से.
व्यवस्थापकीय संचालक
महावितरण, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व)
मुंबई – ४०० ०५१

CMD p/z

Dir(Pro) p/z

प्रत –

१. मा.प्रधान सचिव (ऊर्जा), मंत्रालय, मुंबई
२. सर्व जिल्हाधिकारी

SE(MSC)
Pl. put up
20/4

अत्यंत महत्वाचे

# महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण

(महाराष्ट्र शासन पुरस्कृत)

ISO 9001 : 2000 Reg. no. : RQ 91/2462

क्र. आरईएन/जन/२०१५-१६/ट्रान्सफॉर्मर/१३८१ दिनांक : २९/०३/२०१६

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी

**विषय : तालुक्याच्या ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या ट्रान्सफॉर्मर भवनासाठी लागणारा निधी उपलब्ध करुन देणेबाबत.**

महोदय,

वरील संदर्भाधिन विषयानुसार कळविण्यात येते की, महाउर्जा मार्फत मोठया प्रमाणात अपारंपारिक उर्जेचे नियोजन केले असून सौर नेट मिटरिंग, विंडफार्म तसेच सोलर पार्क असे एकुण १४,४०० मेगावॅट अपारंपारिक उर्जेचे उद्दिष्ट पुढील पाच वर्षात साध्य करावयाचे आहे. यासाठी महावितरणचे वितरण जाळे सक्षम असणे गरजेचे आहे. यामध्ये महावितरणचा वितरण ट्रान्सफॉर्मर ही महत्वाची भूमिका बजावतो. हा ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त झाल्यास दुरुस्त करण्यासाठी प्रत्येक तालुक्यामध्ये ट्रान्सफॉर्मर भवन उभारण्याचे प्रस्तावित आहे.

महावितरण आपल्या सर्वच प्रकारच्या ग्राहकांना अखंडित व नियमित वीजपुरवठा मिळावा यासाठी सतत प्रयत्नशील आहे. विशेषत: ग्रामीण भागातील रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) जळाले किंवा नादुरुस्त झाले तर त्या ठिकाणी नवीन दुरुस्त रोहित्रे लवकर बसविणे अतिशय आवश्यक असते. यामुळे ग्रामीणी भागातील ग्राहक विशेषत: महिला, विद्यार्थी आणि शेतकरी यांना वीजेअभावी अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. या सर्व बाबी विचारात घेऊन महावितरणने आता तालुक्याच्या ठिकाणी ट्रान्सफॉर्मर भवन उभारण्याचा निर्णय घेतला आहे व कार्यवाही सुरु आहे.

प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी ट्रान्सफर्मर भवन उभारण्यात आल्यास नादुरुस्त रोहित्राची ने-आण करण्याच्या कालावधीमध्ये मोठया प्रमाणात बचत होणार आहे. तालुक्याच्या ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या या ट्रान्सफॉर्मर भवनामध्ये अद्ययावत तंत्रज्ञान व यंत्रसामुग्री उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. अशा प्रकारे एका ट्रान्सफॉर्मर भवनासाठी अंदाजित खर्च रुपये ५२.३५ लाख एवढा येणार आहे. मात्र यासाठी आपल्या सहकार्याची अत्यंत आवश्यकता आहे.

**तरी हा खर्च डीपीडीसीच्या नाविन्यपूर्ण योजनेतून करण्यासाठी तसेच आपल्याकडे यावर्षीचा अखर्चित निधी उपलब्ध असल्यास व तो या योजनेमध्ये वळविल्यास मी आपला आभारी राहीन. तसेच या योजनेसाठी पुढील वर्षी भरीव तरतूद करावी, ही विनंती.**

आपला,

(नितीन गद्रे)
महासंचालक

प्रत :

१) मा. प्रधान सचिव, उर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई
२) व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०००५१.

म्हाडा कमर्शिअल कॉम्प्लेक्स, स.न. १९१ - ए, फेज - १, त्रिदलनगर समोर, येरवडा, पुणे ४११ ००६. दुरध्वनी : ०२०-२६६१४३९३ / २६६१४४०३
फॅक्स : ०२०-२६६१५०३१. E-mail : meda@mahaurja.com Web-site : http://www.mahaurja.com